**महसुल विभाग**
जिल्हा निवड समिती
**जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा**
**तलाठी संवर्गातील पदभरती सन २०१६**
**जाहिरात**

---

**जाहीरात क्र.कक्ष-ब/आस्था-३/प्र.क.६५/२०१६/कावि-१२३८/२०१६.** **दिनांक-२०/०८/२०१६**

मा. उप सचिव,महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांनी दिनांक-२३.०६.२०१६ चे पत्रान्वये कळविलेले आहे की, महसूल विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयातील तलाठी संवर्गात सरळ सेवेतील रिक्त असलेली पदे शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दिनांक-२.०६.२०१५, शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.६४/२०१५/वित्तीय सुधारणा-१, दिनांक-१५.०१.२०१६, व शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिमं:१२१४/२८९/ (प्र.क्र.१०८/१४) १३-अ,दिनांक-११.०३.२०१५ मधे दिलेल्या निर्देशाचे अनुषंगाने रिक्त पदे भरण्याकरीता संपूर्ण राज्यात एकाच वेळी परीक्षा घेवून कार्यवाही करण्यात येणार आहे.

त्यानुसार, वर्धा जिल्हयातील महसुल विभागा अंतर्गत उपविभागिय अधिकारी (महसुल) यांचे आस्थापने वरील तलाठी संवर्गातील खालील नमुद प्रवर्गातील रिक्त असलेली पदे सरळ सेवा नामनिर्देशाने भरतीसाठी पात्र उमेदवाराकडून लेखी परिक्षेसाठी अर्ज **दिंनाक-२३/०८/२०१६ ते ०२/०९/२०१६** पर्यंत ऑनलाईन (on line) पध्दतीने मागविण्यात येत आहे. दिलेल्या मुदतीनंतर (दिनांक-०२/०९/२०१६ नंतर) प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१. <u>**आरक्षणानुसार भरावयाचा पदाचा तपशिल खालीलप्रमाणे.**</u>

**पदनाम :- तलाठी (गट-क)**

**वेतन श्रेणी- PB-१** रु. ५२००-२०२०० (ग्रेड पे रु.२४००/-)

| आरक्षण प्रवर्ग | भरावयाची रिक्त पदे | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | पदविधर / अंशकालीन | अपंग | समांतर आरक्षणा व्यतीरीक्त सर्वसाधारण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.जा. | ०४ | ०१ | ० | ० | ०१ | ० | ० | ० | ०२ |
| अनु.जमाती | ०१ | ० | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| वि.जा.अ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भ.ज.ब | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ |
| भ.ज.क | ०१ | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भ.ज.ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| वि.मा.प्र. | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ |
| इ.मा.व. | ०२ | ०२ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खुला | ०३ | ०० | ०१ | ० | ० | ० | ०१ | ०१ | ० |
| **एकुण** | **१३** | **०४** | **०२** | **०** | **०१** | **०** | **०१** | **०१** | **०४** |

टिप- १. तलाठी पदासाठी अपंग आरक्षण:- तलाठी या संवर्गातील रिक्त १३ पदांपैकी ०१ पद अपंगासाठी राखीव पद हे **अंशत: अंध** या प्रवर्गातील पात्र उमेदवाराकरीता राखीव असल्याने त्यामधुनच गुणवत्ते नुसार सदर पद भरण्यात येईल.

टिप-

१. लेखी परीक्षा रविवार दिनांक- **११ सप्टेंबर, २०१६** रोजी वर्धा येथे किंवा वर्धा जिल्हयातील तालुका मुख्यालयी घेण्यांत येईल. परीक्षेचे तारखेत बदल झाल्यास त्याबाबतच्या सुचना कार्यालयीन वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत येईल.
२. नियुक्त्या या रिक्त पदाच्या उपलब्धतेवर अवलंबून राहील. तसेच जाहिरातीमध्ये उल्लेख केलेल्या पदसंख्येत-अतिरिक्त संवर्ग, आंतर विभागीय समायोजन, विभागीय बदली व इतर विभागातील पदांचा आढावा यामुळे पदसंख्येत (कमी/जास्त होणे) व आरक्षणात/समांतर आरक्षणामधे बदल होण्याची शक्यता आहे व बदल करण्याचे अधिकार अध्यक्ष जिल्हा निवड समिती यांना राहील.
३. उमेदवाराचे अर्ज ऑन लाईन (on line) पध्दतीने स्विकारण्यांत येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणीक पात्रतेची कागदपत्रे अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापी ऑन लाईन अर्जामध्ये पूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑन लाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रृटी राहील्यास व अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही.
४. उमेदवाराची लेखी परिक्षा ही उमेदवाराची कोणतीही कागदपत्रे पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्याने कागदपत्राच्या तपासणीत उमेदवारांची कागदपत्रे खोटी/अवैध आढळल्यास उमेदवाराची निवड रद्द केली जाईल.
५. पदांमध्ये बदल झाल्यास अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. पदांची संख्या, समांतर आरक्षणात बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. जिल्हाधिकारी, वर्धा हे स्वत:कडे राखुन ठेवत आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.
६. तलाठी पदावर अंतीम निवड झालेल्या उमेदवारांना प्रथम ६ महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात येईल. सदरच्या कालावधीमध्ये ते परिविक्षाधिन कर्मचारी म्हणुन गणले जातील व सदरचे प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतरच त्यांना तलाठी पदावर नियमित पदस्थापना उपविभागीय अधिकारी(महसूल) यांचे मार्फत देण्यात येईल.

## २. वयोमर्यादा

१. उमेदवाराचे वय जाहीरातीचे दिनांकास किमान १८ वर्ष आवश्यक असुन खुल्या प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.
२. माजी सैनिक प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या माजी सैनिक अर्जदारासाठी सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक: मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ,दिनांक- २० ऑगस्ट, २०१० नुसार " माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधिल पदांसाठी नेमणुकीकरीता विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. तसेच अपंग माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधिल पदांसाठी नेमणुकीकरीता कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष पर्यंत राहील."

३. प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त व अपंग प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या अर्जदारांना जाहिरातीचे दिंनाकास वयाची १८ वर्षे पूर्ण झालेली असणे आवश्यक आहे. तसेच त्याचे कमाल वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

४. पदविधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारासाठी अर्जदाराचे वय जाहिरातीचे दिंनाकास किमान १८ पेक्षा कमी नसावे व कमाल वय ४६ वर्षापेक्षा जास्त नसावे. तसेच अंशकालीन उमेदवारास शासन निर्णय दिनांक २७.१०.२००९ अन्वये देऊ केलेले समांतर आरक्षण हे त्यास शासकिय नोकरी मिळवण्यास साहयभूत ठरावे हया उद्देशाने दिलेले आहे. उमेदवारांनी एकदा समांतर आरक्षणाचा लाभ घेतला आहे त्याच उमेदवारास पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही.

५. खेळाडूसाठी खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून सदर पदासाठी असलेल्या उच्चतम वयोमर्यादेत पाच वर्षापर्यंत वयाची अट शिथील करण्यात येईल.

६. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: निवक-१०१०/प्र.क्र.८/२०१०/१६-अ,दिनांक-६ ऑक्टोंबर, २०१० नुसार स्वातंत्र सैनिकाचे नामनिर्देशीत पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, व सन १९९४ नंतरचे निवडणुककर्मचारी या घटकातील उमेदवारांना शासकीय/निम शासकीय इ. सेवेतील गट-क व गट-ड मधिल पदावर नियुक्ती मिळण्यासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष ईतकी असेल.

३. **शैक्षणिक अर्हता** :-

१. तलाठी पदाकरीता महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांची दिनांक- १ जुलै, २०१० च्या अधिसूचनेनुसार उमेदवाराने संविधानिक विद्यापिठाची पदवी तसेच शासनाने त्याचेशी समतुल्य केलेली अन्य अर्हता उत्तीर्ण असणे किंवा धारण करणे आवश्यक आहे.

२. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण २०००/प्र.क्रं. ६१/२००१ ३९ दिनांक १९ मार्च २००३ मधील सुचनेनुसार नियुक्त होणा-या सर्व उमेदवारांना संगणक अर्हता नमुद केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आंत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

* **D.O.E.A.C.C.** सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर किंवा पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

* महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाकडून घेण्यांत येणारी MS-CIT परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र.

३. उमेदवाराला मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तसेच, माध्यमीक शालांत परीक्षेत मराठी/हिंदी विषयाचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल.

४. उमेदवार हा महाराष्ट्रातील मूळ रहिवासी असावा.महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे (डोमिसीअल) प्रमाणपत्र प्राधिकृत अधिका-याकडून घेतलेले असावे. डोमिसिअल प्रमाणपत्र नसल्यास महाराष्ट्रातील जन्माचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील.